कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/वा.दि.आ/२०२३-२४/११०१
दि. २५/०८/२०२३

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे मंगळवार दि. २९ ऑगस्ट २०२३ रोजी "वार्षिक दिन" सोहळयाचे आयोजन करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम इन्स्टिटयूट मिनेझिस ब्रागांझा यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न होणार आहे. दुपारी ठिक २.३० वाजता इन्स्टिटयूट मिनेझिस ब्रागांझाच्या छोटया सभागृहात मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन दिप प्रज्वलनाने होणार आहे. उद्‌घाटनाच्या कार्यक्रमानंतर हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातील विद्यार्थ्यांचा गायन, वादन व नृत्याचा कार्यक्रम होणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात तबला सहवादनाने होणार आहे. यामध्ये श्री. शैलेश गांवकर यांचे शिष्य कु. ऋषीकेश नाईक, कु. कौशल कवळेकर व कु. कौस्तुभ च्यारी हे तबला सहवादन सादर करतील. त्यानंतर श्री. सुभाष फातर्पेकर यांचे शिष्य कु. गोपिनाथ गावस हे संवादिनी एकल वादन सादर करतील. तदनंतर श्री. रुपेश गावस यांचे शिष्य कु. अवी परवार शास्त्रीय गायन सादर करतील या कार्यक्रमाला जोडून नृत्य विभागातील विद्यार्थांचा नृत्याचा कार्यक्रम होईल त्यामध्ये सर्वप्रथम सौ. वरदा बेडेकर यांच्या शिष्या कथ्थक नृत्य सादर करतील त्यामध्ये कु. श्रृती गावस, नवमी नाईक व कु. प्राची मणेरीकर या विद्यार्थीनी सहभागी होतील तदनंतर सौ. मंदिरा तिरोडकर यांच्या शिष्या कु. निधी नाईक-शिरोडकर व कु. मंजिरी फुटणकर या भरतनाटयम नृत्य सादर करतील व नृत्याच्या कार्यक्रमाची सांगता डॉ. सपना नाईक यांच्या शिष्या कु. जान्हवी प्रभु-म्हांबरे, कु. अनुश्री कोली व कु. मुस्कान खानोलकर यांच्या भरतनाटयम नृत्याने होणार आहे.

सर्व कलाकारांना श्री. पांडुरंग गांवस, श्री. सुरज मोरजकर व श्री. भार्गवराम गर्दे यांची तबलासाथ तसेच श्री. चारुदत्त गावस व श्री. शुभम नाईक यांची संवादिनी साथसंगत लाभणार आहे. कथ्थक नृत्याच्या कार्यक्रमासाठी सौ. वरदा बेडेकर यांची पढंतची साथ तसेच सौ. सम्राज्ञी आईर यांची गायनसाथ विद्यार्थ्यांना लाभणार आहे. तसेच भरतनाटयम नृत्यासाठी डॉ. सपना नाईक व सौ. मंदिरा तिरोडकर यांची नटवंगम साथ तर डी. आर. चेथनमुर्ती यांची मृदंगमसाथ व डॉ. दिप्ता रुबसुंदरम यांची गायन साथ विद्यार्थ्यांना लाभणार आहे.

गायन-वादन, नृत्याच्या कार्यक्रमानंतर ठिक ४.०० वाजता मुख्य कार्यक्रम होणार आहे. यामध्ये हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग तसेच कला अकादमीच्या संगीत केंद्रामधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्त्रीपत्रके व शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येईल. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गोवा राज्याचे कला व संस्कृती व क्रिडा मंत्री आणि कला अकादमीचे अध्यक्ष मा. श्री. गोविंदजी गावडे उपस्थित राहाणार आहेत. तसेच खास निमंत्रीत अतिथी म्हणून इन्स्टिटयूट मिनेझीस ब्रागांझाचे अध्यक्ष श्री. दशरथ परब, कला अकादमीचे सदस्य सचीव श्री. विनेश आर्लेकर, प्रशासकीय संचालिका श्रीमती फ्रान्सकीना ऑलीव्हेरा व हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागाचे प्रभारी संचालक श्री. प्रेमानंद आमोणकर यांची उपस्थिती लाभणार आहे.

सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून संगीत रसिक व विद्यार्थ्यांच्या पालकांनी मोठया संख्येने या कार्यक्रमास उपस्थिती लावावी असे कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे कळविण्यात येत आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)